# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ / फाल्गुन २७, १९४७ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, दिव्यांग कल्याण, अपारंपारिक ऊर्जा मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

(२) ते (५): **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २१**

---

### बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम, नायर व कूपर या रुग्णालयांतील जैववैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत

**(१) * ६६५८ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम, नायर व कूपर या रुग्णालयांतील जैववैद्यकीय कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यात येत नसल्याची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे करण्यात आली असल्याची बाब दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या तीनही रुग्णालयांच्या केलेल्या तपासणीत काय आढळून आले आहे, तसेच जैववैद्यकीय कचऱ्याची योग्यप्रकारे विल्हेवाट न लावणाऱ्या संबंधित रुग्णालयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम, नायर व कूपर या रुग्णालयांतील जैववैद्यकीय कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यात येत नसल्याबाबतच्या तक्रारी माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाल्या आहेत.

(२) मे. एचबीटी मेडिकल कॉलेज आणि डॉ. आर. एन कुपर म्युनिसिपल जनरल हॉस्पिटल, विलेपार्ले, मे. सेठ जीएस मेडिकल कॉलेज आणि केईएम हॉस्पिटल, परेल, मुंबई व मे. बी.वाय.एल. नायर चॅरिटेबल हॉस्पिटल आणि टोपीवाला नॅशलन मेडिकल कॉलेज हे तिन्ही रुग्णालय बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असून तेथील सेवा ही सामान्य जनतेकरीता उपलब्ध करुन देण्यात येते.

रुग्णालयातील जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन योग्यरित्या होत नसल्याबाबत वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. तसेच तक्रारीही प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने तिन्ही रुग्णालयांना अनुक्रमे दिनांक ३०/०९/२०२५, २०/१०/२०२५ व मे. बी.वाय.एल. नायर चॅरिटेबल कॉलेज या रुग्णालयास तक्रार प्राप्त होण्या अगोदरच दिनांक ०७/०८/२०२५ ला प्रस्तावित निर्देश देण्यात आले असून दिनांक २७/०२/२०२६ रोजी अंतरीम निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात प्लास्टिक फुल विक्रीवर बंदी घालण्याबाबत

**(२) * ६८५२ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गणेशोत्सव तसेच इतर उत्सवांमध्ये प्लास्टिक फुलांची मोठ्या प्रमाणावर विक्री झाल्याने शेतकऱ्यांच्या नैसर्गिक फुलांच्या उत्पादीत मालाला योग्य दर न मिळाल्याने शेतकऱ्यांचे पर्यायाने फुलांच्या बाजारपेठेचे मोठे नुकसान झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लास्टिक फुलांच्या वापरामुळे पर्यावरणीय हानी तसेच नैसर्गिक जैविक चक्रावरदेखील गंभीर परिणाम होत असून उक्त प्लास्टिक फुलांवर बंदी घालण्याबाबत गत पावसाळी अधिवेशनामध्ये घोषणा करण्यात आली असून त्याबाबतचा आदेश अद्याप निर्गमित न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांच्या नैसर्गिक फुलांच्या उत्पादनाला चालना देण्यासाठी, पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी तसेच आदेश निर्गमित करून प्लास्टिक फुलांवर बंदी घालण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल, २०१८ च्या अधिसूचनेनुसार सजावटीच्या उद्देशान वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक आणि थर्माकॉलवर जे की सजावटीसाठी वापरले जातात यावर देखील पूर्णत: बंदी आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २९/०८/२०२५ रोजी सण-उत्सव काळात कृत्रिम फुलांचा वापर टाळण्याच्या अनुषंगाने परिपत्रक जारी केले आहे.

तसेच, पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १२/०८/२०२१ रोजीच्या अधिसूचनेनुसार सजावटीसाठी पॉलिस्टीरिन (थर्मोकॉल) वर देखील बंदी घातली आहे.

(३) महाराष्ट्र विघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत तरतूदीनुसार एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने दरमहा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस विभाग यांची संयुक्तपणे चार दिवस विशेष मोहिम राबविण्यात येते. यामध्ये मुख्यत: फेरीवाले, फुलविक्रेते, स्थानिक

बाजारपेठ, भाजी बाजार, दुकाने, रेल्वेस्थानके, बसस्थानके, विमानतळे, घाऊक विक्रेते, मॉल्स, उपहारगृहे, उद्योग तथा आंतरराज्यीय सिमेवर तपासणी करुन दोषी आस्थापनांवर कारवाई करण्यात येते. महाराष्ट्र विघटनशील कचरा नियंत्रण कायदा, २००६ अंतर्गत तरतुदीनुसार माहे एप्रिल, २०२५ ते जानेवारी, २०२६ पर्यंत एकूण १,२४,७८३ आस्थापनांची पाहणी करण्यात आली आहे. त्यापैकी उल्लघंन करणाऱ्या ३३९० आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, एकूण रुपये १.५५ कोटी इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच एकूण ६७.५४ मे. टन एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) येथे शेतकऱ्यांच्या जागेत सौर ऊर्जा प्रकल्पांतर्गत अनधिकृतरित्या पोल उभारणी केल्याबाबत

**(३) * ६६८८ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) येथे 'आवादा' सौर ऊर्जा कंपनीकडून शेतकऱ्यांच्या खाजगी जागेत त्यांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता किंवा योग्य मोबदला न देता विद्युत पोल उभारण्याचे काम पोलीस बंदोबस्तात सुरू केल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बेकायदेशीर कृतीला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, खाजगी मालकीच्या हक्कांचे व नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सौर ऊर्जा प्रकल्पासाठी ५१ एकर गायरान जमीन केवळ १ रुपये नाममात्र दराने कंपनीला उपलब्ध करून दिली असतानाही, शेतकऱ्यांच्या हद्दीतून विनापरवाना पोल उभे केल्याने शेती व्यवसायात अडथळे निर्माण होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) येथील शेतकऱ्यांच्या खाजगी जागेत अनधिकृत प्रवेश करून काम करणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याऐवजी शेतकऱ्यांवरच अन्याय करणाऱ्या या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने संबंधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला व न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

विद्युत कायदा, २००३ व भारतीय टेलिग्राम कायदा,१९८५ नुसार विद्युत वितरण परवानाधारक कंपनीस विद्युत वाहिनी उभारण्याचे अधिकार आहेत. तथापि, स्थानिक शेतकऱ्यांना कामामध्ये अडथळा आणल्याने पोलीस बंदोबस्तामध्ये सदरचे काम करण्यात आले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

सदर प्रकल्पाच्या मंजूर उच्चदाब वाहिनीपैकी १.५ किमी उच्चदाब वाहिनीस शेतकऱ्याचा विरोध होता. त्यामुळे सदर १.५ कि.मी. चे काम करण्याकरीता महसूल व पोलीस प्रशासनाची मदत घेऊन सदर

वाहिनीचे काम सर्व नियमांचे पालन करून पूर्ण करण्यात आले आहे. सदरचे पोल उभे केल्याने शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

उच्चदाब वाहिनी उभारणीच्या कामामध्ये अडथळा आणणाऱ्या शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन नंतर सोडून दिले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील द्वारका उपविभागीय कार्यालयाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी महावितरणचे कंत्राट नियमबाह्य पध्दतीने दिल्याबाबत

**(४) * ७७५२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील द्वारका उपविभागीय कार्यालयाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून स्वतःच्या मुलाला महावितरणचे कंत्राट नियमबाह्य पध्दतीने दिल्याची तसेच सदर कंत्राट मिळविण्यासाठी बनावट कागदपत्रे, खोटे अहवाल आणि अधिकृत नोंदणी नसलेल्या कागदपत्रांचा वापर करण्यात आला असून यामुळे महावितरण व शासनाचे कोट्यवधी रुपयांचे महसुली नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाथर्डी (नाशिक) परिसरातील अनेक प्रकल्पांमध्ये अवैधरित्या वीजवापर, नियमबाह्य मंजुरी आणि तांत्रिक फेरफार ही सर्व कामे अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्या कार्यकाळात नियमांचे उल्लंघन करून करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक कार्यकर्त्यांनी पुराव्यांसह लेखी तक्रारी करूनही महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्यास टाळाटाळ केली असून, या संपूर्ण प्रकरणात मुख्य दोषी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, कंत्राटदार आणि त्यांना सहाय्य करणारे इतर संबंधित अधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

नाशिक येथील व्दारका उपविभागीय कार्यालयाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री.नारायण मोतीराम सोनवणे यांच्या मुलाच्या नावावरील माधवगिरी इलेक्ट्रिकल्स ॲण्ड सोलर सोल्युशन्स यांचा महावितरणच्या सूचीबध्द कंत्राटदारांच्या यादीत समावेश नाही. तसेच सदर कंत्राटदाराला महावितरणकडून कोणतेही कंत्राट देण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, काही बांधकाम व्यावसायिकांव्दारे अवैध वीज वापर केल्याचे निदर्शनास आले होते. त्यांच्यावर विद्युत कायदा २००३ मधील लागू असलेल्या कलमानुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यात गुन्हेगारीत वाढ झाल्याबाबत

**(५) * ८३६४ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा शहर मोठ्या प्रमाणात गुन्हेगारीच्या विळख्यात सापडल्याचे तसेच भरदिवसा कोयता गँगने एका युवकाची निर्घृण हत्या केल्याची घटना माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा शहरासह जिल्ह्यात भरदिवसा घडणारे खून, प्राणघातक हल्ले, खंडणी, बेकायदेशीर शस्त्रांचा वापर तसेच टोळीयुध्द आणि कोयते काढून वचपा काढण्याच्या वाढत्या घटनांमुळे सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती देखील निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पार्श्वभूमीवर गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणण्यासाठी विशेष पोलीस मोहीम, गुन्हेगारांची धरपकड, प्रतिबंधात्मक कारवाई, अवैध शस्त्रसाठ्यावर धाडसत्र, रात्रीच्या गस्तीत वाढ, संवेदनशील भागांत अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करणे व सीसीटीव्ही यंत्रणेचा वापर वाढविणे तसेच युवकांमध्ये वाढत चाललेली टोळी संस्कृती, बेरोजगारी व सामाजिक घटकांमुळे निर्माण होणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणण्यासाठी प्रतिबंधात्मक सामाजिक व प्रशासकीय उपाययोजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सातारा शहरामध्ये एका युवकाची निघृण हत्या केल्याची घटना दिनांक २२/०१/२०२६ रोजी घडली असून सदर गुन्ह्याबाबत शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १०३, १४०(१), १८९(४), ६१(२)(अ), १११(२)(अ)(ब), १११(३), १११(४)(५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील गुन्ह्यात एकूण १५ आरोपी त्यापैकी ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे, उर्वरित ४ आरोपींचा शोध सुरु आहे.

तसेच सातारा शहरात गंभीर गुन्ह्यांच्या सदराखाली सन २०२४ मध्ये ३७ गुन्हे दाखल होते, तर सन २०२५ मध्ये १४ गुन्हे दाखल आहे.

(२) सातारा शहर व जिल्ह्यातील दाखल गंभीर गुन्ह्यांबाबत आकडेवारी खालीलप्रमाणे आहे:-

| गुन्ह्याचा प्रकार | सन २०२४ | सन २०२५ | वाढ/घट |
|---|---|---|---|
| खून | ४८ | ३८ | -१० |
| खूनाचा प्रयत्न | ११३ | ८२ | -३१ |
| सदोष मनुष्यवध | १९ | ७ | -१२ |
| दरोडा | १५ | १८ | +३ |
| जबरी चोरी | १२३ | ४९ | -७४ |
| एकूण | ३१८ | १९४ | १२४ |

उपरोक्त प्रमाणे आकडेवारी पाहता सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये दाखल गंभीर गुन्ह्यामध्ये घट झालेली आहे. याबाबत सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण नसल्याचे तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती देखील निर्माण झाली नसल्याचे पोलीस मुख्यालयाकडुन प्राप्त अहवालात नमुद केले आहे.

(३) सातारा जिल्हा पोलीस घटकाकडुन गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे:-

सातारा जिल्ह्यामध्ये गुन्हेगारीला आळा बसावा या करीता सातारा जिल्हा पोलीस दलाकडुन विशेष मोहिमांचे आयोजन करण्यात येत असून यामध्ये दिनांक ११/०२/२०२६ ते २५/०२/२०२६ या कालावधीत अवैध अग्नीशस्त्र जप्तीकरीता अवैध अग्नीशस्त्र विशेष शोध मोहिम राबविण्यात आली आहे. या मोहिमे दरम्यान ४ पिस्टल ९ काडतुसे मिळुन आलेली आहेत.

याशिवाय गुन्हे निर्गती मोहीम, फरार आरोपींना पकडण्यासाठी विशेष मोहिम, वॉरंट/ समन्स बजावणी मोहिम, ऑपरेश मुस्कान अंतर्गत हरविलेल्या व्यक्तींची शोध मोहिम अशा विविध प्रकारच्या मोहिमा राबविण्यात येत आहे.

पाहिजे असलेल्या/ फरार आरोपी तसेच गंभीर गुन्ह्यातील आरोपींना शोधण्याकरीता पोलीस ठाणे स्तरावर गुन्हे प्रकटीकरण शाखेकडुन तसेच जिल्हा स्तरावर स्थानिक गुन्हे शाखेकडुन गुन्हेगारांच्या धरपकड करीता धाडसत्र राबविण्यात येत आहे.

सन २०२५ मध्ये सातारा जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५, ५६, ५७ अन्वये एकूण ५३ जणांना सातारा जिल्ह्यातुन हद्दपार करण्यात आलेले आहे.

जिल्ह्यामध्ये गुन्ह्यांचे प्रमाण वाढु नये याकरीता दररोज संपूर्ण जिल्ह्यात रात्रगस्त राबविण्यात येत आहे. रात्रगस्ती दरम्यान सराफा बाजार, बँका, पतसंस्था, एसटी स्टँड, रेल्वे स्टेशन, पेट्रोलपंप, एटीएम, सर्वधर्मीयांची धार्मिक स्थळे, सराईत गुन्हेगार, हिस्ट्रीशीटर यांची तपासणी केले जाते. सातारा जिल्ह्यामध्ये स्मार्ट ई-बीट पंचिंग सुरु केले आहे. प्रभावी रात्रगस्तीकरीता रोजचे रोज वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत देखरेख करुन मार्गदर्शन व सुचना देण्यात येतात.

अवैध शस्त्रसाठ्याच्या अनुषंगाने सन २०२५ मध्ये जिल्हा पोलीस दलाकडुन पिस्तल-३७, राऊंड-७३, सिंगल बोअर बंदुक-१, छऱ्यांची बंदुक-१, मोकळे काडतुस ५, मोकळे मॅगझिन ७ अशी अग्नीशस्त्रे तसेच इतर शस्त्रामध्ये एअरगन-१, कोयते-२१, तलवार-१२, सुरे-३, गुप्त्या-३, कुऱ्हाड-१, सत्तुर-२, लोखंडी रोड-१, करवत-१, लोखंडी फायटर-१, चाकु-१, कुकरी-१, लाखंडी कटावणी-१, बोल्ट कटर-१ अशी विविध शस्त्रे जप्त करण्यात आलेली आहे.

महत्वाचे सण/उत्सव, यात्रां दरम्यान एक दिवस अगोदर व नंतर नाकाबंदी नेमली जाते तसेच कोम्बींग ऑपरेशन करण्यात येते.

दर आमावस्येला नाकाबंदी नेमण्यात येते, यामध्ये महत्वाचे चौक, सराफ बाजारपेठ तसेच शहरामध्ये येणारे मुख्य रस्त्यांवर नाकाबंदी नेमली जाते. यामध्ये संशयित वाहने व संशयित इसम यांना तपासून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येते.

सातारा जिल्हामध्ये गुन्ह्यांना प्रतिबंध करण्याकरीता सातारा जिल्ह्यामध्ये सन २०२५ मध्ये एकूण १७,५०४ प्रतिबंधक कारवाया करण्यात आलेल्या आहेत.

धार्मिक संवेदनशील ठिकाणी विशेष शाखेमार्फत विशेष लक्ष ठेवुन दक्षता घेतली जात आहे. तसेच मॉर्निंग स्कॉड व संवेदनशील भागात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करुन संवेदनशिल ठिकाणे ईबीटद्वारे चेक केली जात आहेत.

तसेच सातारा जिल्हामध्ये खाजगी विभागाकडुन एकूण ८७६३ सीसीटीव्ही कॅमेरे बसविले असून सरकारी विभागाकडुन बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरांची संख्या २२६१ एवढी आहे. याद्वारे २४ तास निगराणी राखली जात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील 'गुलजार-ए-रजा' या संस्थेने कोटयवधी रूपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(६) * ८३८८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात ‘गुलजार-ए-रजा’ या नावाने चालविण्यात येत असलेल्या कथित संस्थेमार्फत निधी संकलन करून सुमारे रुपये ४ कोटी ७३ लाखांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली असून या प्रकरणी संबंधितांपैकी दोघांना अटक करण्यात आल्याची घटना दिनांक १० जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर येथील एका बँकेत संबंधित व्यक्तींनी अनेक खाती उघडून धार्मिक ट्रस्टच्या नावाने जमा करण्यात आलेली रक्कम वैयक्तिक वापरासाठी वळविल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून निधी संकलनातील गैरव्यवहार, आर्थिक व्यवहारांचा मागोवा तसेच या प्रकरणाचा आंतरराष्ट्रीय नेटवर्कशी संबंध आहे काय, याबाबत तपास करून दोषींवर कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :**

(१) पात्रुड (ता.माजलगाव, जि.बीड) येथे गुलजार-ए-रजा नावाने बनावट ट्रस्ट स्थापन करुन सदर गुन्ह्यातील आरोपींनी अन्य संस्थेचा नोंदणी क्रमांक वापरुन धार्मिक कार्याच्या नावाखाली देणगी म्हणुन लोकांकडुन विविध बँक खात्यात रुपये ४,७३,६७,५०३/- इतकी रक्कम जमा केली. सदर प्रकरणी फिर्यादीवरुन एकूण चार आरोपींविरुध्द पोलीस ठाणे माजलगाव, ग्रामीण येथे दिनांक ०८ जानेवारी, २०२६ रोजी गु.र.नं. ०९/२०२६ कलम ३१८(४), ३३५, ३३६(२), ३४०, ३(५) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरच्या गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित दोन आरोपींचा शोध सुरु आहे.

(२) सदर प्रकरणात आरोपींनी अक्सीस बँक, मार्केट यार्ड, लातुर शाखा येथे धार्मीक ट्रस्टच्या नावाने ५ बँक खाती उघडली आहेत.

सदर रक्कम धार्मिक कामासाठी वापरात आल्याचे आतापर्यंतच्या तपासात दिसुन आले आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी करुन तात्काळ उपरोक्त प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून दोन आरोपींना दिनांक ०८/०१/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.

अटकेतील दोन्ही आरोपींची मा.न्यायालयाकडुन दिनांक १५/०१/२०२६ पर्यंत पोलीस कस्टडी प्राप्त झाली. तसचे आरोपींची घरझडती घेण्यात आली आहे.

ॲक्सीस बँकेकडुन संबंधित बँक खात्यांची स्टेटमेंट घेण्यात आले आहे तसेच जिल्हा वक्फ अधिकारी अहिल्यानगर यांच्याकडुन फैजान-ए-कन्झुल इमान भिंगार अहिल्यानगर या संस्थेचा रजिस्ट्रेशन क्रमांक गुलजार-ए-रजा या ट्रस्टकडुन वापरला गेल्याचे निष्पन्न झाल्याने जिल्हा वक्फ अधिकारी यांच्याकडुन त्या रजिस्टर्ड ट्रस्टची कागदपत्रे हस्तगत करण्यात आले आहेत.

तसेच जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांना पत्र देवुन विचारणा केली असता त्यांच्याकडे गुलजार-ए-रजा संस्थेचे रजिस्ट्रेशन नसल्याबाबत जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी कळविले आहे. तसेच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, केज यांनी गुलजार-ए-रजा फाँडेशन, सत्तार गल्ली, पात्रुड ही संस्था त्यांच्या कार्यालयांतर्गत देखील नोंदणी करण्यात आली नसल्याचे कळविले आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपींनी गुलजार-ए-रजा या संस्थेचे धर्मादाय उपआयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड यांच्याकडे रजिस्ट्रेशन न करता अन्य संस्थेच्या रजिस्ट्रेशन नंबर चा फसवणुकीने वापर करुन लोकांकडुन गुलजार-ए-रजा या ट्रस्टच्या नावाने जवळपास ४,७३,६७,५०३/- इतकी रक्कम जमा केली. तसेच या संस्थेने अशा पध्दतीने अन्य संस्थेचा रजिस्ट्रेशन नंबर वापरुन ३ वर्षांचे आयकर रिटर्न भरले आहेत. व अशा पध्दतीने आयकर विभागाची संबंधित बनावट संस्थेकडुन फसवणुक झाल्याने ही बाब आयकर विभाग, छ.संभाजीनगर यांच्या निदर्शनास आणण्यात आली आहे व त्यांच्या स्तरावर स्वतंत्र चौकशी व कायदेशीर कारवाई करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

तसेच संस्थेचे ऑडिट रिपोर्ट हस्तगत केलेले आहेत, अटकेतील आरोपींचे मोबाईल हॅन्डसेट जप्त करण्यात आले असून मोबाईल नंबरचे सीडीआर घेण्यात आले आहे, हस्तगत करण्यात आलेले बँक स्टेटमेंटची पडताळणी चालु आहे. सद्य:स्थितीत सदरच्या गुन्ह्याचा पुढील अधिकचा तपास सुरु आहे.

(४) विलंब नाही.

-----------------

## भिवी (ता.भिवापूर, जि.नागपूर) येथील २६ शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(७) * ८४८५ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवी (ता.भिवापूर, जि.नागपूर) येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे पट्टे त्यांच्या नावावर करून देण्याचे आमिष दाखवून एका दलालाने २६ शेतकऱ्यांकडून सुमारे रुपये १३ लाख ३० हजार घेऊन त्यांची फसवणूक केल्याची घटना माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित व्यक्तीने प्रत्येक शेतकऱ्याच्या नावावर स्वतंत्र सातबारा उतारा मिळवून देण्याचे आश्वासन देऊन शेतकऱ्यांकडून टप्प्याटप्प्याने रक्कम घेतली असून या प्रकरणी बेला पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करून कारवाईची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी व्यक्तीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे, तसेच फसवणूक झालेल्या २६ शेतकऱ्यांची रक्कम परत मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पोलीस स्टेशन बेला, जि.नागपूर (ग्रामीण) अंतर्गत मौजा भिवी, ता.भिवापूर, जि.नागपूर येथील सर्वोदय सहकारी सामुदायिक शेती सोसायटीच्या नावावर असलेली भुमापन क्र. २०१, भोगवटादार वर्ग-२, एकूण १०७ हेक्टर आराजी असलेल्या शेतजमिनीबाबत सोसायटीच्या ३२ सदस्यांपैकी २६ सदस्यांना त्यांच्या नावाने स्वतंत्र पट्टे व सातबारा उतारे करून देण्याचे आमिष दाखवून आरोपीने दिनांक २४/०१/२०२२ ते १४/०६/२०२२ या कालावधीत संबंधित २६ सदस्यांकडून एकूण ₹१३,३०,०००/- रुपये रक्कम स्वीकारुन फसवणूक केली आहे.

दिनांक १९/०३/२०२५ रोजी अर्जदार यांचा तक्रार अर्ज पोलीस स्टेशन बेला जि.नागपूर (ग्रामीण) येथे प्राप्त झाला होता. सदर तक्रार अर्जाची सखोल चौकशी करून आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर (ग्रामीण) यांच्याकडून कागदपत्रांची पडताळणी व गुन्हा दाखल करण्यास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर फिर्यादी यांच्या मौखिक तक्रारीवरुन, सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बेला, जि.नागपूर (ग्रामीण) येथे दिनांक ३०/१२/२०२५ रोजी भारतीय दंड संहिता कलम ४०६, ४२० अन्वये अप.क्र. ५३३/२०२५ नोंद करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी आरोपीस दिनांक १४/०२/२०२६ रोजी अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाकडून पी.सी.आर.(पोलीस कस्टडी रिमांड) मंजूर करण्यात आला होता.त्यादरम्यान आरोपीकडून रोख ₹४०,०००/- जप्त करण्यात आले आहेत.

तसेच आरोपीचे बँक स्टेटमेंट प्राप्त करून त्याचे बँक खाते गोठविण्याबाबत Canara Bank, जरीपटका, नागपूर यांच्याशी तसेच, स्थावर मालमत्तेबाबत माहिती मिळविण्यासाठी दुय्यम निबंधक, पारशिवनी यांच्याकडे दिनांक १६/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये पत्रव्यवहार करण्यात आला आहे. साक्षीदार व पीडितांचे सविस्तर जबाब नोंदविण्यात आले असून आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

तसेच आरोपीविरुध्द इस्तेगाशा क्र. ०८/२०२६, भा.ना.सू.सं. कलम १२९(ड)(ई)(ग) अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदस्यांची रक्कम परत मिळवून देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूरात जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(८) * ८५१६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात सन २०२५ मध्ये वर्षातील एकूण ३६५ दिवसांपैकी २०१ दिवस वायू प्रदूषणाची पातळी अनुमत मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे तसेच सदर मोठ्या प्रमाणावर प्रदूषण वाढण्यास कोळसा खाणी, औष्णिक वीज प्रकल्प, सिमेंट उद्योग तसेच जड वाहनांची वाहतूक कारणीभूत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या प्रदूषणामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्यावर, विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व श्वसनविकारग्रस्त रुग्णांवर गंभीर परिणाम होत असूनही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने चंद्रपूर येथील प्रदूषण नियंत्रणाबाबत प्रभावी कारवाई न केल्यामुळे परिस्थिती गंभीर झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गंभीर प्रकारास जबाबदार असलेल्या संबंधित उद्योगांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रणासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांची वेळोवेळी पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधित उद्योगांवर नियमाप्रमाणे कारणे दाखवा नोटीस, अंतरीम निर्देश, प्रस्तावित निर्देश व बँक हमी जप्त करणे याप्रमाणे कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील विविध हॉटेल्स मध्ये अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(९) * ८५४६ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) तालुक्यामध्ये अवैध व्यवसायांमध्ये वाढ झाली असून, शहरातील विविध हॉटेल्स मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब मुलींना आमिष दाखवून त्यांचेवर अत्याचार करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध व्यवसायांना आर्वीचे उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक प्रोत्साहन देत असून शहरात बिअर बार आणि गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन चौकशी केली आहे काय, चौकशीअंती संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करून अवैध व्यवसाय चालविणाऱ्या हॉटेल चालकांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ११/०२/२०२६ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे आर्वी शहरातील हॉटेलमध्ये अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या अनुषंगाने हॉटेल व लॉजेसची तपासणी करण्यात आली असता तपासणीदरम्यान नमूद प्रकार आढळून आलेला नाही, असे पोलीस अधीक्षक, वर्धा यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(२) व (३) आर्वी, पोलीस स्टेशन जिल्हा वर्धा हद्दीत अवैध दारू, गांजा, गुटखा, सट्टा व अंमली पदार्थ यांच्या वाहतूक व विक्रीवर प्रतिबंध करण्यासाठी आर्वी पोलीस स्टेशन, वर्धा यांच्याकडून सन २०२४ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अवैध धंदे करणाऱ्या इसमांवर विविध कायद्यांअंतर्गत खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दारुबंदी कायदा:-

सन २०२४ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत एकूण १,३९५ गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण ४,९८,९८,८२०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गुटखा :-

अवैध गुटखा संबंधात ०६ गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण ८,१७,३७३/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सट्टा / जुगार:-

या बाबत १७४ गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण १४,५४,८९२/- रुपये किंमतीचा

गांजा प्रकरण:-

गांजा संबंधित प्रकरणात ०९ गुन्हे दाखल केले आहेत.

COTPA Act :-

अंतर्गत एकूण ४० गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण ८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच, आर्वी पोलीस स्टेशन, वर्धा हद्दीत बिअर बार नाहीत.

तसेच निवदेनात नमूद असल्याप्रमाणे उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक, आर्वी पोलीस स्टेशन, वर्धा यांचा अवैध धंद्यांना प्रोत्साहन देणे, अवैध धंदे चालविण्यात सहभाग असल्याची बाब चौकशीअंती निष्पन्न झालेली नाही, असे पोलीस अधीक्षक, वर्धा यांच्या दिनांक ०७/०३/२०२६ रोजीच्या अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील आरे दुग्ध वसाहतीत बेकायदेशीर वृक्षतोड तसेच काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याबाबत

**(१०) * ८५५० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील आरे दुग्ध वसाहतीतील युनिट (२०) मागील परिसर भारतीय पुरातत्व विभागाने महत्त्वाचे स्थळ घोषित केला असून, सदर परिसरात बेकायदेशीर वृक्षतोड, झाडे जाळणे तसेच काँक्रीटीकरण इ. कामे सुरू असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ च्या मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्र लगत असलेल्या या भागात सुरू असलेल्या कामांमुळे नैसर्गिक तसेच ऐतिहासिक स्थळाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिक व पर्यावरणप्रेमीच्या माहितीनुसार सन २०२४ च्या निवडणूक कालावधीत युनिट २१ मधील परिसरात मोठ्या प्रमाणावर कॉंक्रीट मिश्रण व बांधकामाचा मलबा बेकायदेशीररित्या टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आरे दुग्ध वसाहतीतील युनिट (२०) मागे व युनिट २१ मधील आणि संपूर्ण आरे वन सुरक्षित ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
आरे दुग्ध वसाहतीमध्ये युनिट नं.२१ येथे सन २०२४ मध्ये बेकायदेशीरपणे टाकण्यात आलेले कॉंक्रीट मिश्रण व बांधकामाचा मलबा हे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचेमार्फत त्याचवेळी तात्काळ हटविण्यात आले असून संबंधीतांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(४) आरे दुग्ध वसाहतीमधील विविध युनिटमध्ये दैनंदिन गस्ती घालणे, झालेल्या अतिक्रमणावर निष्कासन कार्यवाही करणे, अतिक्रमणकर्त्यांवर पोलीस ठाणेत गुन्हे नोंद करणे, शासकीय मालमत्तेचे संरक्षण करणे, अनधिकृत डेब्रीज भरणी कामावर प्रतिबंध घालणे याकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडील प्रशिक्षीत ३३ सुरक्षा कर्मचारी बाहय यंत्रणेव्दारे घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जुहू येथे दिग्दर्शकाच्या निवास्थानाबाहेर गोळीबार झाल्याबाबत

**(११)** * **८५७१ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जुहू परिसरातील ‘शेट्टी टॉवर’ या इमारतीजवळ दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या निवास स्थानाबाहेर दिनांक १ फेब्रुवारी, २०२६ रोजी मध्यरात्री अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केल्याची गंभीर घटना घडल्याने परिसरात भीतीचे व तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेदरम्यान निवासस्थानाबाहेर एकूण पाच गोळया झाडण्यात येवून त्यापैकी एक गोळी घराच्या गॅलरीच्या काचेतून आत शिरली असून, सदर तपासात घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून शस्त्राचा प्रकार व वापरलेल्या वाहनांची माहिती मिळाली असून, संशयित आरोपींना अटक करून या घटनेमागील संभाव्य कारणे व गुन्हेगारी पार्श्वभूमी निष्पन्न झाले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर संबंधित दिग्दर्शक तसेच परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने अतिरिक्त पोलीस बंदोबस्त, गस्त वाढविणे तसेच संवेदनशील भागांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ०१/०२/२०२६ रोजी रात्री श्री.रोहित शेट्टी यांच्या शेट्टी टॉवर या निवासस्थानाच्या बिल्डींगच्या कंम्पाऊड भिंतीलगत एका अनोळखी इसमाने पिस्टल सारख्या अग्निशस्त्राने शेट्टी टॉवरच्या दिशेने गोळीबार केला. त्यानुषंगाने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन जुहू पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. १२६/२०२६, भा.न्या.सं.कलम १०९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१), ३७(२) भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ अन्वये गुन्हा नोन्द करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा अधिक तपासासाठी गुन्हे प्रकटीकरण शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.सदर गुन्हा गु. र. क्र. १९/२०२६ असा पुनर्नोद करण्यात आला आहे. त्यानुसार सदर प्रकरणी भा.न्या.सं. कलम १०९, ६१(२), २३८, ३(५) भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५, २७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१),३७(२),१३५ महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ कलम ३(१)(ii),३(२), ३(४) अन्वये गुन्हा दाखल आहे.

(२) रोहित शेट्टी यांच्या निवासस्थानाबाहेर एकूण ०५ गोळया झाडण्यात आल्या. एक गोळी रोहित शेट्टी यांच्या घराच्या गॅलरीच्या काचेला लागली.

संचालक, रासायनिक विश्लेषण विभाग यांच्याकडून सदरचे काचेचे तुकडे व ०५ रिकाम्या पुंगळया हस्तगत करण्यात आल्या आहेत. घटनास्थळाच्या सी.सी.टी.व्ही. फुटेजवरुन त्यांनी गुन्हयामध्ये वापरलेले अग्नीशस्त्र, गुन्हयात वापरलेले वाहन,तसेच मोबाईल फोन सिमकार्डसह जप्त करण्यात आले आहेत व गुन्ह्याचा पुढील सखोल तपास सुरु आहे.

सदर गुन्ह्यातील १३ अटक आरोपींपैकी ०३ आरोपीतांची गुन्हेगारी पार्श्वभुमी असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच पाहिजे आरोपींची देखील गुन्हेगारी पार्श्वभुमी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) नमूद गुन्हयात एकूण १३ आरोपींना अटक करण्यात आली असून मा.विशेष मोक्का न्यायालयाच्या आदेशान्वये १२ आरोपी न्यायालयीन कोठडीत असून ०१ आरोपी सद्य:स्थितीत पोलीस कोठडीत आहे. सदर गुन्ह्यातील ०३ पाहिजे आरोपीचा शोध सुरु असून सदर प्रकरण तपासाधिन आहे.

सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर दिग्दर्शक रोहित शेट्टी यांना संरक्षण पुरविण्यात आले आहे.

अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी तसेच परिसरातील नागरीकांच्या सुरक्षेसाठी पोलीस ठाणे स्तरावर नाकाबंदी, अतिरीक्त पोलीस बंदोबस्त व गस्त वाढविण्यात आली आहे. तसेच संवेदनशिल भागांमध्ये विशेष तपास मोहिम राबवून सराईत गुंडावर प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दक्षिण मुंबई येथील वाहनांवर दंडात्मक कारवाई करताना गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(१२)** * **८५७७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मध्ये दुचाकी तसेच चार चाकी वाहनांकरीता पार्किंगसाठी जागा निश्चित केलेली असून या व्यतिरिक्त अन्य जागांवर वाहनाची पार्किंग केली असता त्या वाहनांवर दंड आकारला जात असून अनेक वेळेला दुचाकी तसेच चारचाकी वाहने ‘‘टोईंग’’ करून घेऊन जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षिण मुंबई मधील मंत्रालय परिसरात ‘‘टोईंग’’ करताना जागेवरच संबंधित गाड्यांवर ऑनलाईन पध्दतीने दंड न आकारता घेऊन जाऊन जेथे गाड्या जमा करतात तेथे संबंधित गाडी मालकाला बोलवून घेऊन मोठ्या दंडाची भीती दाखवून बोलणी करतानाच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून तांत्रिक कारण देत ऑफलाईन दंडाच्या नावाखाली गैरव्यवहार घडत असून वाहन उचलताना त्या क्षणीच दंड आकारण्याच्या सूचना विभागाला देण्याबाबत तसेच जे अधिकारी व कर्मचारी अशा प्रकारचे काम करत आहेत त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबई शहरात महापालिकेकडून पार्किंगसाठी जागा निश्चित केल्या जातात. नियमाचे उल्लंघन करुन पार्किंग करणाऱ्या वाहनांवर वाहतूक पोलीसांमार्फत ई-चलन प्रणालीद्वारे ऑनलाईन दंड आकारण्यात येतो. अशी कारवाई करताना जे वाहन चालक जागेवर उपस्थित असतील त्यांची वाहने जागेवरच दंड भरुन घेऊन सोडून देण्यात येतात आणि वाहन चालक जागेवर उपस्थित नसल्यास वाहन वाहतूक चौकी येथे आणण्यात येते व टोईंग कारवाईचा दंड भरुन संबंधित वाहन चालकाच्या ताब्यात देण्यात येते.

गाडी मालकाला बोलवून दंडाची भीती दाखवून बोलणी केल्याच्या अथवा गैरव्यवहाराच्या तक्रारी प्राप्त नाहीत.
(३) वाहतूक पोलीस कर्मचारी यांना अवैध पार्कींग प्रकरणी ई-चलन प्रणालीद्वारे ऑनलाईन दंड आकारण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या परिसरात बनावट उच्च सुरक्षा नोंदणी पाटी तयार करण्यात येत असल्याबाबत

**(१३) * ६६८९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) परिसरातील दलालांकडून बनावट ‘उच्च सुरक्षा नोंदणी पाटी’ (HSRP) ही कोणत्याही कागदपत्रांची किंवा वाहनाची तपासणी न करता ५०० ते १२५० रुपये आकारून केवळ २० मिनिटांत तयार करून देण्यात येत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहनचालकांना अधिकृत नंबर प्लेटसाठी महिनाभर प्रतीक्षा करावी लागत असताना, दलालांकडून बनावट पाटी देऊन शासनाच्या ‘उच्च सुरक्षा नोंदणी पाटी’ धोरणाचे उल्लंघन होत असून, सदर बेकायदेशीर कृत्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना बनावट नंबरप्लेट मिळविणे सहज शक्य झाले असून, यामुळे सार्वजनिक सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी सखोल चौकशी करून शासकीय नियमांची पायमल्ली करून नाशिक येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या परिसरात बनावट नंबरप्लेट तयार करणाऱ्या दलालांवर व केंद्रांवर कोणती कारवाई केली आहे,
(४) असल्यास, शासनाने वाहनचालकांची ‘उच्च सुरक्षा नोंदणी पाटी’ (HSRP) मध्ये होणारी फसवणूक टाळण्यासाठी कोणती ठोस उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) याबाबतची बातमी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती.

(२) उच्च सुरक्षा नोंदणी पाटी बसविण्यासाठीची बनावट केंद्र आढळून आलेली नाहीत. सबब, त्यांचेविरुध्द कारवाई करणे शक्य झालेले नाही. बनावट उच्च सुरक्षा नोंदणी पाटी तयार करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेण्याबाबत मोटार वाहन निरीक्षक यांना निर्देश देण्यात आले असून, बनावट उच्च सुरक्षा नोंदणी पाटी बनविणारी केंद्र आढळून आल्यास त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

(३) व (४) जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी बसविण्यासाठी ३ कंपन्यांमार्फत कार्यवाही सुरु आहे. जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी बसविण्यासाठी अपॉईंटमेंट घेण्यासाठी परिवहन विभागाच्या वेबसाईटवर माहिती देण्यात आली आहे. तसेच नागरिकांच्या माहितीसाठी सर्वसाधारण प्रश्नोत्तरे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहेत. तसेच बनावट उच्च सुरक्षा नोंदणी पाटी लिंकद्वारे फसवणूकीचे प्रकार करणाऱ्या उच्च सुरक्षा नोंदणी पाटी बसविणाऱ्या कंपन्यांवर सायबर क्राईम गुन्हे शाखा, ग्रँट रोड (पूर्व), गिरगाव, मुंबई येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनीचे संचालक (संचलन) व चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशनचे मुख्य अभियंता यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(१४) * ७७८० ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनीचे संचालक (संचलन) व चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशनचे मुख्य अभियंता यांनी पदाचा दुरुपयोग करुन विविध ठेक्यांच्या निविदा मंजुरी प्रकियेत ठेकेदाराशी संगनमत करुन कोटयवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरएफएक्स क्र.३००००६२८४७ अंतर्गत सुमारे ७.८२ कोटी, आरएफएक्स क्र.३००००६२८०२ अंतर्गत सुमारे १८ कोटी व आरएफएक्स क्र.३००००६२९८७ अंतर्गत सुमारे १.४७ कोटी रुपयांच्या टिनशेडचे बांधकामाच्या निविदेत मुख्य अभियंता यांनी नियमात बदल करुन कन्वेयर बेल्ट स्ट्रक्चर बांधकामाचा अनुभव अनावश्यकरित्या जोडून मर्जीतील ठराविक ठेकेदाराला पात्रता मिळवून दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणात ठेका सिंडीकेट सक्रिय असून, ही ठेका सिंडीकेट कोटयवधी रुपयांच्या कामांचे ठेके पूर्वनियोजित व संगनमताने विशिष्ट ठेकेदार गटाला देण्यासाठी रिंग सिस्टीमचा अवलंब करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गैरव्यवहारामुळे शासकीय निधीचा अपव्यय होत असून नियमांचे उल्लंघन करणारे संचालक (संचलन), मुख्य अभियंता यांचेसह विभागातील संबंधित दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून तसेच निविदा प्रक्रिया रद्द करून ठेकेदाराचा काळया यादीत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशन (CSTPS) संदर्भात उल्लेख करण्यात आलेल्या एकूण तीन RFX पैकी RFX क्र.३००००६२८४७ व RFX क्र.३००००६२८०२ हे दोन्ही प्रस्ताव सामान्य देखभाल व दुरूस्ती (R& M/O& M) बजेट अंतर्गत नसून स्वतंत्र DPR/CAPEX योजनांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. या दोन्ही CAPEX योजनांना नियमानुसार महानिर्मिती कंपनीच्या संचालक मंडळ तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (MERC) यांची मंजुरी प्राप्त आहे. तसेच, RFX क्र.३००००६२९८७ हा प्रस्ताव चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशनशी संबंधित नाही.

उपरोक्त दोन्ही कामे कोळसा हाताळणी विभागातील Conveyor Belt चालू अवस्थेत असताना करावयाची असल्याने व ती प्रत्यक्ष विद्युत निर्मितीशी निगडित असल्याने याबाबतच्या कामाचा अनुभव ही अट निवेदेमध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे.

CSTPS शी संबंधित वरील दोन्ही निविदा सध्या केवळ ई-निविदा प्रणालीतील प्रक्रियेत असून, अद्याप कोणतीही निविदा अंतिम करण्यात आलेली नाही. कोणत्याही कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आलेला नाही.

महानिर्मिती कंपनीच्या सर्व खरेदी प्रक्रिया ई-निविदा प्रणालीद्वारे, महानिर्मिती कंपनीच्या खरेदी धोरणानुसार तसेच महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित खरेदी नियमांचे पालन करून, स्पर्धात्मक व पूर्णत: पारदर्शक पध्दतीने राबविण्यात येतात.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई शहराच्या प्रदूषणात वाढ झाल्याबाबत

**(१५) * ८३६६ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहरात गामी, डेल्टा, मेट्रो, कामधेनू, ट्रायसिटी, आकार, अक्षय आदी बांधकाम विकासकांकडून मोठ्या प्रमाणात निवासी व व्यावसायिक बांधकाम प्रकल्प सुरू असून या प्रकल्पांदरम्यान धूळप्रदूषण, बांधकाम साहित्याची अयोग्य साठवण, माती व मलबा वाहतुकीमुळे रस्त्यांवर धुळीचे प्रमाण वाढणे तसेच पर्यावरणीय नियमांचे पुरेसे पालन न होणे यामुळे शहरात व परिसरात प्रदूषण वाढत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकाम प्रकल्पांमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून श्वसनाचे आजार, ॲलर्जी व इतर आरोग्य समस्यांचे प्रमाण वाढल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत काय, तसेच या संपूर्ण प्रकरणाची नवी मुंबई महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा संबंधित यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरणीय व बांधकाम नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांवर कामबंदी, दंडात्मक कारवाई, पर्यावरणीय अटींची सक्ती, अथवा नियमांचे गंभीर उल्लंघन आढळल्यास संबंधित विकासकांचे परवाने स्थगित किंवा रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

तथापि, आरोग्य अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार बाहय रुग्ण विभागात घशात खवखव, कोरडा खोकला, श्वास घेण्यास त्रास अशा तक्रारी असलेल्या रुग्णांची संख्या वाढलेली नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने एकूण १० बांधकाम प्रकल्पांना संमतीपत्रातील अटी व शर्तीचे अनुपालन न केल्यामुळे प्रस्तावित निर्देश दिले आहेत.

नवी मुंबई महापालिकेने पारित केलेल्या प्रदुषणाच्या मानक कार्यप्रणाली नुसार ८७ बांधकाम धारकांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत. तसेच सदर मानक कार्यप्रणालीची पुर्तता न करणाऱ्या विकासकांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली असून एकूण रक्कम रुपये १,५८,९९,६७१/- वसुली करण्यात आली आहे. सदर, (SOP) मानक कार्यप्रणालीची पुर्तता होईपर्यंत १८ विकासकांचे काम बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील विश्रांतवाडी परिसरातील अल्पवयीन मुलाची हत्या झाल्याबाबत

**(१६) * ८३८९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील टिंगरेनगर, विश्रांतवाडी परिसरात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलाचे अपहरण करून त्याला खेड शिवापूर येथील डोंगर परिसरात नेऊन धारदार शस्त्राने अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याची गंभीर घटना दिनांक १० जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात एका तरुणीसह सुमारे अकरा जणांविरुध्द अपहरण, कट रचणे व खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित आरोपींना अटक करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाचा सखोल व जलद तपास करण्यासाठी विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे काय, आरोपींविरुध्द कठोर कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती पावले उचलली आहेत, तसेच पीडित कुटुंबाला आर्थिक किंवा इतर प्रकारची मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी एका अल्पवयीन मुलाचे अपहरण करुन त्याचा खुन केला यावरुन विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे दिनांक ३१/१२/२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता कलम १३७(२), १४०(१), १०३(१), ६१(२), २३८, ३(५) बाल न्याय कायदा २०१५ कलम ८४ तसेच, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह कलम १३५ अन्वये गु.र.नं ३७५/२०२५ नोंद करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी दाखल गुन्ह्यात अद्यापर्यंत १२ जणांचा सहभाग निष्पन्न झाला आहे. त्यापैकी ०४ जण विधीसंघर्षीत बालक व ०१ विधीसंघर्षीत बालिका आहे व या गुन्ह्यात ०७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.तसेच, विधीसंघर्षीत बालकांविरुध्द बाल न्याय मंडळ, पुणे येथे पुढील कार्यवाहीकरीता अहवाल सादर करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासासाठी पोलीस निरीक्षक (गुन्हे), विश्रांतवाडी पो.स्टे, पुणे शहर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात आली असून सदर प्रकरणी तपास सुरु आहे. तपासाअंती मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

तसेच, सदर प्रकरणातील मयत अल्पवयीन मुलगा याने त्याचा भाऊ व इतर साथीदार यांच्या मदतीने या गुन्हयातील १ आरोपीस जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने धारदार हत्याराने वार करून गंभीर जखमी केले होते. या संदर्भात उत्तमनगर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे भारतीय न्याय संहिता कलम १०९(१), ३५१(३),११५(२), ३(५) भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह कलम १३५ क्रिमीनल लॉ ॲमेडमेंट ॲक्ट कलम ७ अन्वये दिनांक १२/०९/२०२५ रोजी गु.र.नं ११७/२०२५ नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा अंतिम अहवाल बाल न्याय मंडळ येरवडा यांच्या न्यायालयात सादर करण्यात आलेला असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक परिसरातील उद्योगांकडून प्रदूषण नियंत्रण नियमांचे पालन होत नसल्याबाबत

**(१७) * ८४८८ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (ता.बोईसर, जि.पालघर) औद्योगिक परिसरातील विविध रासायनिक व प्रदूषणकारक उद्योगांमधून होणारे वायू, जल व घनकचरा प्रदूषण सातत्याने वाढत असल्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याच्या तक्रारी वारंवार येत असून, परिसरात दुर्गंधी, दूषित पाणी, त्वचारोग व श्वसनविकार यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत असल्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी पर्यावरण विभाग व मा.पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांच्याकडे दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तारापूर औद्योगिक परिसरात सुमारे १,५०० औद्योगिक युनिट्स कार्यरत असून त्यांपैकी अनेक उद्योगांमधून प्रदूषण नियंत्रण नियमांचे पालन होत नसल्याच्या तक्रारी असूनही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अपेक्षित ती प्रभावी कारवाई होत नसल्याने या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी समिती किंवा विशेष तपास यंत्रणा नियुक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीअंती प्रदूषणास कारणीभूत ठरलेल्या उद्योगांवर व संबंधित कारखानदारांवर अथवा जबाबदार अधिकाऱ्यांवर दंडात्मक, प्रशासकीय किंवा कायदेशीर कारवाई करून उद्योगांना नोटीस बजावून त्यांचेकडून दंडात्मक रकमेची आकारणी करून किंवा बंदीची कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, परिसरातील प्रदूषण नियंत्रणासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता वाढविणे, धोकादायक कचऱ्याचे शास्त्रीय व्यवस्थापन, हवेच्या गुणवत्तेचे नियमित परीक्षण व नागरिकांच्या आरोग्य तपासणीसाठी विशेष उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रचलित कार्यप्रणालीनुसार उद्योगांची पाहणी करण्यात येते. तसेच, भरारी पथकामार्फत देखिल पाहणी करुन दोषी आढळलेल्या उद्योगांविरुध्द कार्यवाही करण्यात येत असते.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांची वेळोवेळी पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधित उद्योगांवर नियमाप्रमाणे कारणे दाखवा नोटीस, अंतरीम निर्देश, प्रस्तावित निर्देश व बँक हमी जप्त करणे याप्रमाणे कारवाई करण्यात येते.
(४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत औद्योगिक परिसरात सद्य:स्थितीत २५ दशलक्ष लिटर/दिन क्षमतेचे संयुक्त सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यान्वित असून उर्वरीत २५ दशलक्ष लिटर/दिन क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे काम (सी ई टी पी) प्रगती पथावर आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीत स्थित उद्योगामधून निर्मित होणारा घनकचरा नियमितपणे सामुहिक घनकचरा प्रक्रिया केंद्र तळोजा येथे पुढील प्रक्रिया व विल्हेवाटीकरीता पाठविण्यात येतो.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तारापूर औद्योगिक परिसर तसेच सभोवतालच्या परिसरातील हवेच्या गुणवत्तेचे नियमित परीक्षण करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई विरार शहरामध्ये अनधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या परदेशी नागरिकांकडून अवैध व्यवसाय करण्यात येत असल्याबाबत

**(१८) * ८५२६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार शहरातील अनेक ठिकाणी अनधिकृतपणे राहणाऱ्या नायजेरिया व इतर देशातील नागरिकांपैकी काहींचा अंमली पदार्थांच्या खरेदी-विक्री व इतर गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभाग असल्याबाबतच्या तक्रारी तसेच वसई-विरार शहरातील विविध सार्वजनिक व निवासी परिसरांमध्ये बेकायदेशीर वेश्याव्यवसाय सुरू असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परदेशी नागरिकांचा अंमली पदार्थांच्या खरेदी-विक्रीमध्ये सहभाग तसेच शहरातील अनेक सार्वजनिक ठिकाणी चालणाऱ्या वेश्याव्यवसायावर बंदी आणून संबंधितांवर कडक कारवाई करण्याबाबतची मागणी नागरिकांकडून होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अनधिकृतपणे वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांची ओळख पटविणे, त्यांची कायदेशीर स्थिती तपासणे व आवश्यक ती निर्वासनाची (डिपोर्टेशन) कार्यवाही करण्यासाठी, तसेच अंमली पदार्थांच्या व्यवहारात सहभागी असलेल्या व्यक्तींविरोधात एनडीपीएस कायद्यान्वये व वसई-विरार शहरातील बेकायदेशीर वेश्याव्यवसायावर बंदी घालण्यासाठी व संबंधित दलाल व सहभागी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०२६ मध्ये माहे फेब्रुवारी २०२६ अखेर नायजेरिया आणि युगांडा देशातील नागरिकांचा अंमली पदार्थांच्या खरेदी विक्रीमध्ये सहभाग असल्याबाबतचे एकूण २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

i)तुळींज पोलीस स्टेशन येथे दिनांक ०३/०१/२०२६ रोजी गु.र.नं.६/२०२६ एनडीपीएस कायदा, १९८५ चे कलम ८(क), २१, २२(क), २९ सह The Immigration and Foreigners Act, २०२५ चे कलम ३, २३, २४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात १ नायजेरियन आरोपीला अटक करण्यात आली आहे. ३ आरोपींचा शोध सुरू आहे.

ii) तुळींज पोलीस स्टेशन दिनांक ०४/०२/२०२६ रोजी गु.र.नं.१२१/२०२६ एनडीपीएस कायदा, १९८५ चे कलम ८(क), २१(क), २२(क), २९ सह The Immigration and Foreigners Act, २०२५ चे कलम ३, २३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात २ युगांडा देशाचे नागरिक आरोपी असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. एका आरोपीचा शोध सुरू आहे.

वसई-विरार शहरातील सार्वजनिक व निवासी परिसरामध्ये बेकादेशीर वेश्या व्यवसाय सुरू असलेबाबत जुलै २०२५ मध्ये १ गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यात एकूण ६ बांग्लादेशी नागरिकांस अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दिनांक २३/०९/२०२५ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयामार्फत अनधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या विदेशी नागरिकांचा शोध घेण्यासाठी दिनांक २६/०१/२०२६ ते ०९/०२/२०२६ दरम्यान विशेष मोहिम राबविण्यात आली आहे. सदर मोहिमेंतर्गत २४९ आफ्रिकन नागरिकांचा शोध घेण्यात आला आहे. त्यापैकी ४२ आफ्रिकन नागरिकांना डिपोर्ट करण्यात आले आहे. उर्वरित आफ्रिकन नागरिकांना डिपोर्ट करण्याची प्रक्रिया चालू आहे. तसेच, २ बांग्लादेशी नागरिकांना डिपोर्ट करण्यात आले आहे.

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत वेश्या व्यवसायावर बंदी आणून संबंधितांवर कडक कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने महिला अत्याचार प्रतिबंधात्मक कक्ष/विशेष बाल संरक्षण व काळजी कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुलांचा इंटरनेट व सोशल मीडियाचा वाढता वापर नियंत्रित करण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना करण्याबाबत

**(१९) * ८१०८ श्री.सत्यजीत तांबे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **माहिती तंत्रज्ञान मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १६ वर्षांखालील मुलांमध्ये मोबाईल, इंटरनेट व सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे विविध सर्व्हेक्षणातून निदर्शनास आले आहे तसेच या वाढलेल्या स्क्रीन टाईममुळे मुलांच्या मानसिक आरोग्यावर, अभ्यासावर व सामाजिक वर्तनावर प्रतिकूल परिणाम होत असल्याबाबत पालक, तज्ज्ञ व लोकप्रतिनिधींकडून वारंवार चिंता व्यक्त केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुलांचा अनियंत्रित इंटरनेट व सोशल मीडियाचा वापर, ऑनलाईन गेमिंग, आक्षेपार्ह मजकूर व सायबर गुन्ह्यांचा धोका वाढल्यामुळे राज्यातील बालसुरक्षेच्या दृष्टीने गंभीर अडचणी निर्माण होत असून या पार्श्वभूमीवर मुलांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना व जनजागृती उपक्रम अपेक्षित परिणाम साधण्यात अपुरे ठरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १६ वर्षांखालील मुलांचा इंटरनेट व सोशल मीडियाचा वापर रोखण्यासाठी किंवा नियंत्रित करण्यासाठी नियमावली तयार करून स्क्रीन टाईम मर्यादा, पालक नियंत्रण (parental control) व वय आधारित निर्बंध लागू करण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधी, पालक संघटना व सामाजिक माध्यमांतून सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात मुलांचा इंटरनेट व सोशल मीडियाचा वापर नियंत्रित करण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करणे, जनजागृती मोहिमा राबविणे, शाळा–पालक समन्वय वाढविणे इ. बाबत व आवश्यक असल्यास कायदेशीर तरतुदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१), (२), (३) हे खरे आहे.
(४) व (५) मा.मंत्री, (माहिती व तंत्रज्ञान) यांच्या निर्देशानुसार, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत राज्यात मुलांचा इंटरनेट व सोशल मीडिया वापर नियंत्रित करण्यासाठी विविध संबंधित क्षेत्रांमधील तज्ञ यांचा समावेश असलेली एक तज्ज्ञ टास्कफोर्स स्थापन करण्यात येत आहे.सदर टास्कफोर्स खालील बाबींचा अभ्यास करणार आहे :

- अल्पवयीन मुलांमधील सामाजिक माध्यम वापराचे स्वरूप व प्रमाण
- मानसिक, शारीरिक व शैक्षणिक परिणाम
- डिजिटल जाहिराती व ऑनलाईन प्लॅटफॉर्मचा प्रभाव
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियामक चौकटींचा अभ्यास
- आवश्यक कायदेशीर, तांत्रिक व प्रशासकीय उपाययोजना

सदर टास्कफोर्स विहित कालावधीच्या आत आपला अहवाल शासनास सादर करेल. त्यानंतर टास्कफोर्समार्फ़त प्राप्त शिफारसींच्या आधारे शासनाकडून, मुलांचे संरक्षण तसेच शिक्षण, डिजिटल सक्षमीकरण व तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर अबाधित राहील याबाबत पुढील आवश्यक निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## उलवे (नवी मुंबई) येथील बांधकाम कामगाराच्या मृत्यूची चौकशी करण्याबाबत

**(२०)** * **८४६८ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उलवे (नवी मुंबई) येथील सेक्टर २६ मधील भूखंड क्र. ३४० मधील या बांधकाम व्यावसायिकाकडे काम करणाऱ्या बांधकाम कामगाराचा ५ ते ६ महिन्यांपूर्वी अपघाती मृत्यू होऊनही सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गुन्हा हा घटना घडल्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर दाखल करण्यात आला असून, सदर प्रकरणी एन.आर.आय. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला परंतु बांधकाम व्यावसायिकांकडे कामगारांचा संपूर्ण तपशील तसेच ओळख तपासून काम देणे बंधणकारक असतानाही सदर मृत कामगाराची अद्याप ओळख पटली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अपघाती मृत्यू प्रकरणी दोषी असणाऱ्या मूळ बांधकाम व्यावसायिकांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कामगार विभागासह सिडको अधिकारी यांची देखील जबाबदारी निश्चित करुन सदर प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नवी मुंबई, पोलीस आयुक्तालयातील उलवा, पोलीस ठाणे हद्दीतील सेक्टर २६ मधिल भुखंड क्र. ३४०, ट्रायसिटी बेल्सीरा या ईमारतीच्या बांधकामाच्या ठिकाणी बांबुची परांची बांधण्याचे काम करीत असताना, दिनांक २६/०३/२०२५ रोजी एक कामगार दहाव्या मजल्यावरुन खाली पडून जखमी झाला. त्यास उपचाराकरीता उप जिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल केले असता, तेथील वैदयकिय अधिकारी यांनी दिनांक २६/०३/२०२५ रोजी दाखलपुर्व मयत घोषित केले. त्याबाबत पनवेल (उलवा) पोलीस ठाणे अकस्मात मृत्यू रजिस्टर नं. ४१/२०२५ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १९४ प्रमाणे दिनांक २६/०३/२०२५ रोजी नोंद करण्यात आली.

सदर अकस्मात मृत्यू प्रकरणातील मयताची ओळख पटली असून शव त्याचा मेहुणा आणि पत्नी यांनी ताब्यात घेतले. सदर इसम बांधकामाचे ठिकाणी काम करीत असताना कॉन्ट्रक्टर ने सुरक्षेची साधने न पुरविल्याने १० व्या मजल्यावरुन खाली पडुन मयत झाला आहे असे चौकशी दरम्यान निष्पण्ण झाले आहे. याबाबत मयत इसमाच्या पत्नीने दिलेल्या तक्रारी वरुन दिनांक २६/०४/२०२५ रोजी पनवेल शहर, पोलीस ठाणे (उलवा) गुन्हा रजि नं १९७/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी, ०२ आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दिनांक १९/०७/२०२५ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. सदर गुन्हा सध्या न्यायप्रविष्ट आहे.

महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ चे नियम २६३ अन्वये सदर बांधकामास दिनांक १७/०६/२०२५ रोजी मनाई आदेश निर्गमित करण्यात आला आहे. तसेच, सदर भुखंडास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ आणि प्रचलित एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतूदीनुसार विहित शुल्क आकारुन परवानगी देण्यात आली असल्याने सिडको अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नसल्याबाबत नगरविकास विभागाने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

वारसदारास नुकसान भरपाई म्हणून रुपये ९,९५,५००/- दिनांक २७/०२/२०२६ रोजीचा डी.डी. नुकसान भरपाई आयुक्त, कामगार न्यायालय, ठाणे, यांच्याकडे जमा केल्याचे कामगार उपआयुक्त, रायगड-पनवेल यांनी कळविले आहे. सदर नुकसान भरपाईची रक्कम मा.न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून वारसपत्नीस अदा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हदगाव (जि.नांदेड) येथील शेतकऱ्यांकरिता 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेची अंमलबजावणी करणेबाबत

**(२१)** * **८४९० श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव (जि.नांदेड) येथील हदगाव, बामणी फाटा, पळसा, मनाठा परिसरात मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेची अंमलबजावणी संथ गतीने होत असल्यामुळे माहे डिसेंबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात पैसे भरूनही ७१६ शेतकऱ्यांपैकी ४२३ शेतकऱ्यांचे सहा महिन्यापासून सौर ऊर्जा पंपाचे अर्ज प्रतिक्षेत असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित भागातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित अर्जांची संख्या, प्रत्यक्ष बसविण्यात आलेल्या सौर कृषी पंपांची संख्या व उर्वरित अर्ज प्रलंबित राहण्यामागील कारणांची चौकशी केली आहे काय, तसेच, अर्ज मंजूर होऊनही प्रत्यक्षात सौर कृषी पंप कार्यान्वित न झालेल्या प्रकरणांमध्ये संबंधित कंत्राटदार, पुरवठादार संस्था किंवा संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित अर्जांची तातडीने पूर्तता करून संबंधित शेतकऱ्यांना सौर कृषी पंप उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

हदगाव (जि.नांदेड) येथील हदगाव, बामणी फाटा, पळसा, मनाठा परिसरात " मागेल त्याला सौर कृषी पंप " योजनेंतर्गत सौर पंपासाठी माहे डिसेंबर २०२५ अखेर ६५ लाभार्थ्यांचे पैशाचा भरणा केलेले अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी ५७ लाभार्थ्यांनी पुरवठादारांची निवड केली असून ३४ सौर पंप आस्थापित करण्यात आले आहेत. उर्वरित सौर पंप आस्थापित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहेत.

त्याचप्रमाणे, हदगाव तालुक्यात माहे डिसेंबर २०२५ अखेर २६२६ लाभार्थ्यांचे पैशाचा भरणा केलेले अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी १६९४ लाभार्थ्यांनी पुरवठादारांची निवड केली असून १०५१ सौर पंप आस्थापित करण्यात आले आहे. उर्वरित पंप आस्थापित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे,

शेतात पीक असल्याची स्थिती, सौर पंप बसविण्याच्या ठिकाणाची सौर पंप सामान वाहतुकीची भौगोलिक परिस्थिती व अर्जदारांच्या ज्येष्ठता यादीनुसार सौर कृषी पंपांची स्थापना करण्यात येते.

निविदेच्या अटी व शर्तीनुसार पुरवठादारास कार्यादेश मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत सौर पंप बसविणे आवश्यक आहे. सौर पंप आस्थापनेस दिरंगाई व उशीर झाल्यास संबंधित पुरवठादारास सौर कृषी पंप किमतीच्या १०% मर्यादेपर्यंत दंड आकारण्यात येतो.

हदगाव (जि.नांदेड) येथील हदगाव, बामणी फाटा, पळसा, मनाठा परिसरात मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेंतर्गत विहीत मुदतीत कामे पूर्ण न केल्याने संबंधित पुरवठादारांवर रुपये २६,९५५/- इतक्या रकमेची दंडात्मक कारवाई प्रस्तावित केलेली असून या पुरवठादारांची देयके प्राप्त झाल्यानंतर सदर दंडात्मक रक्कमेची देयकांमधून कपात करण्यात येणार आहे.

(३) सौर पंप आस्थापनाची कामे जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना पुरवठादारांस देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.